13

२९/११/०२

५२२६५।६६

जा.क्र.प्रा.प्राशि/खाप्राशा/तु.मा./पुवि/०२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 27 NOV 2002

प्रति,

१. शिक्षणाधिकारी/(प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

३. प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

विषय : विनाअनुदानित/कायम विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना सन २००१-०२ या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वाढ/अतिरिक्त तुकडी वर्ग मंजूर करण्याबाबत,

संदर्भ : मा. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील खाप्राशा/०२/तु.मा./६०७३३/ड-५१२, दि. १२.११.२००२ चे पत्र.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना वर्ग/तुकडया सन २००१-०२ या वर्षापासून *कायम विना अनुदान तत्वावर* व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही तरोच भविष्यात अनुदानाची मागणी करणार नाही व 'सदरचे वर्ग प्रत्यक्षात सुरु असतील' या अटीवर संदर्भाधीन पत्रान्वये परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | किलबिल प्रायमरी स्कूल, २४६/२७ जनवाडी, पुणे-१६ | इंग्रजी | म. न. पा. | १ली, २री व ४ थी ची दुसरी तुकडी | मंजूर |

सदर प्राथमिक शाळांनां वर्ग/तुकड्यांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

मूळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

१. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
किलबिल शाळा

२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
यांचेकडे संदर्भाधीन [illegible]

11

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर,पुणे - ४११ ००५,
जा.क्र./मनपा/खाप्राशा/४८२० /२००१-२००२,
पुणे,दिनांक :- ६/१/०३

10/1/03

शाळाप्रमुख,

किलबिल प्रायमरी
स्कूल २४६/२६,
जनवाडी पुणे १६

विषय :- खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना-
अनुदानित प्राथमिक शाळांना सन २०००-२००१
या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नवीन अतिरिक्त
तुकडया/वर्ग मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- १] प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्रमांक-खाप्राशा/
२०००/तुका/६०७३२/ड-५१२ दि.९.८.२००१.
२] मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र जा.क्र. प्रा/
प्राशि/खाप्राशा/तुका/पुवि/~~२००१ दि.१८.८.२००१.~~ 26/11/02
५२२६५/६६

संदर्भांकित पत्रास अनुसरुन तुमचे शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या अतिरिक्त तुकडया/वर्गांना सन २०० - २०० या वर्षात शासन परिपत्रक क्रमांक व्ही.एल.एस-१०००/[७४३/२०००]प्राशि-३ दिनांक ११.७.२००१ मधील विहित अटींना अधीन राहून मान्यता देणेत आलेली आहे.

| शाळेचे माध्यम | शासनाने मंजूर केलेली अतिरिक्त तुकडी/नवीन वर्ग | | | | | | | अनुदानित/विना-अनुदानित/कायम विनाअनुदानित कालांतराने अनुदान तत्वावर येणाऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ ली | २ री | ३ री | ४ थी | ५ वी | ६ वी | ७ वी | |
| इंग्रजी | इ १ली ची दुसरी तुकडी | इ २री ची दुसरी तुकडी | — | इ. ४थी ची दुसरी तुकडी | | | | कायम विना अनुदानित |

......२/-

- पान दोन -

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

अ] शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे. [एस.एस.सी.डी.एड्]

ब] सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

क] सदर शाळेने स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

[illegible] असा[illegible]

ड] शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

इ] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

ई] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन तेथी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रत - माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे - ४११ ००१.

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र. ३८५ खाप्रांशा/०५ – ०६
दिनांक — २५।४।२००६

व्यवस्थापक/शाळाप्रमुख
किरकोळ. ग्रामसभा. ...,
२४६. जनवाडी. पुणे-१६

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एस. १००२ (१०००/०२) प्राशि – ३ दिनांक २३.०९.२००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकड्या – वर्गांना सन २००४ – ०५ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे रू. २० किंवा रू. १०० . स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | इंग्रजी | इ. ३री | अतिरिक्त दुसरी तुकडी | जून २००४ |
| | | इ. ५वी | — | जून २००४ |
| | | इ. ६वी | — | जून २००४. |

अटी व शर्ती :

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून दयावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहीजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या नवीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असवयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विदयार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

[signature]
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

12

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र/खाप्राशा/ ५५/ २००४-०५
दिनांक ७/७/०५

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
किल्बील प्रायमरी स्कूल
२४५/२४६/२४८ जनवाडी,
पुणे - १६.

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एस. १००२(१०००/०२) प्राशि - ३ दिनांक २३.०९.२००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया - वर्गांना सन २००४-०५ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे या २० रू. स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे माध्यम | वर्ग/ तुकडया मान्यता मंजुरी वर्ग. |
|---|---|---|
| १ | इंग्रजी/मराठी माध्यम<br>इंग्रजी माध्यम | इयत्ता ८वी अतिरिक्त दुसरी तुकडी जून २००४ मान्यता. |

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

जा.क्र.माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे/ १०८६२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १. यांचे कार्यालय,
दिनांक :- - 2 SEP 1998

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद ~~xxxx~~ पुणे.

विषय :- प्रथम मान्यता

" किलबील सेकंडरी स्कूल " जनवाडी, पुणे-१६

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह.प्र.मा./९८ दि ८.८.९८

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये " किलबील एज्यु. सोसायटी जनवाडी संस्थेच्या " किलबिल सेकंडरी स्कूल जनवाडी " माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/ ~~९ वी~~ ~~१० वी~~ च्या वर्गास १९९६/१९९७ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९६ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे यांची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे या बाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षीत शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत .
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्यायावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३] पुरेशी विद्यार्थी संख्या असावी
१४] विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमात सहभाग असावा.
१५] अध्यापनात शै. साधनाचा वापर असावा.

शिक्षण उपसंचालक,